## प्रेस नोट ता. २९/०५/२०२३ पोलीस स्टेशन - वाकड

# डिलेव्हरी करीता मोठया सोसायटींमध्ये प्रवेश करुन तेथील महागडया सायकली चोरुन त्या ओएलएक्स ॲपवर विकणा-या चोरटयास अटक किं.रु.८५,०००/- च्या ०६ सायकली जप्त वाकड पोलीस स्टेशन तपास पथकाची कामगिरी.

--- ०० ---

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात चो-यांचे प्रमाण मोठया स्वरुपात वाढलेले असल्याने त्याअनुषंगाने **मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त,पिंपरी चिंचवड,** यांनी सर्व पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांना जास्तीत जास्त पोलीस अंमलदार नेमुन सतर्क पेट्रोलींग करणेबाबत तसेच गुन्हे प्रकटीकरण विभागातील पोलीस अधिकारी, अंमलदार यांना सक्त पेट्रोलींग करुन चोरीचे गुन्हयांना आळा घालणेबाबत आदेश दिले आहेत.

दरम्यान इसम नामे संदीप दिगंबर तांबे वय ४३ वर्षे व्यवसाय-नोकरी रा.फ्लॅट नं.४०४, इंद्रायणी अपार्टमेंट, सिध्दीविनायक कॉलनी, श्रिनगर रहाटणी पुणे यांनी पोलीस स्टेशनला येवुन तक्रार दाखल केली की, त्यांचे मुलास घेतलेली सायकल एक अनोळखी इसमाने राहते बिल्डींगचे पार्कीग मधुन चोरुन नेली आहे. अशी तक्रार दाखल झाली.

सायकली चोरी होण्याचे प्रमाणे वाढल्याने मा.श्री.गणेश जवादवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाकड पोलीस ठाणे यांनी त्यांचे अधिनस्थ असलेल्या तपास पथकातील सपोनि संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण व तपास पथक अंमलदार प्रतिबंधात्मक पेट्रोलींग करत गुन्हयांना आळा घालुन गुन्हे उघड करणेबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी सिसीटीव्ही फुटेज व बातमीदारांचे मार्फत तपास सुरु केले असता असे निदर्शनास आले की, सदरचा अनोळखी चोरटा हा डिलेव्हरी बॉय असुन तो डिलेव्हरी देणेचे बहाण्याने सोसायटी मध्ये प्रवेश करुन तेथील महागडया सायकली चोरी करीत आहे. अशी माहीती मिळालेने त्या अनुषंगाने तपास सुरु केला.

पोउपनि.सचिन चव्हाण व त्याचे दिमतीस असलेला पोलीस स्टाफ असे रहाटणी परीसरात पेट्रोलींग करीत असताना त्यांना माहीती मिळाली की, एक इसम चोरीची सायकल विक्री करणेकरीता तापकीर मळा चौकाजवळ येणार आहे. अशी माहीती मिळालेने पोउपनि.सचिन चव्हाण व त्याचे सोबतचे पोलीस स्टाफने मिळाले बातमीचे ठिकाणी सापळा रचुन थांबले. मिळाले बातमी प्रमाणे एक इसम सायकलवर तेथे आला त्याचे बाबत खात्री झालेने त्यास ताब्यात घेवुन नाव पत्ता विचारला असता त्याने आपले नाव राहुल रविंद्र पवार वय २५ वर्षे रा.श्रीकृष्ण कॉलनी नं.०१, श्रिकृष्ण जिमच्या बाजुला, काळेवाडी पुणे असे सांगीतले त्याचे ताब्यातील सायकल बाबत विचारणा केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली.

त्याचेकडे कौशल्यपुर्ण तपास केला असता त्याने गुन्हयाची कबुली देवुन सांगीतले की, मी डिलेव्हरी बॉय असुन जेथे जेथे डिलेव्हरी देणेकरीता जात असे तेथे लावलेले सायकलींवर पाळत ठेवुन वेळ मिळाला की, सदरच्या सायकली चोरुन त्या ओएलएक्स ॲपवर जाहीरात देवुन लोकांना विकत होतो असे सांगुन किं.रु.८५,०००/- च्या एकुण ०६ महागडया सायकली काढुन दिल्या त्या जप्त करणेत आल्या असुन अधिक तपास करीत आहोत.

सदरची कारवाई मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.श्री.डॉ.संजय शिंदे सो, सह.पोलीस आयुक्त, मा.श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री. डॉ.काकासाहेब डोळे सो, पोलीस उप आयुक्त,परि-२, पिंपरी चिंचवड, मा. श्री. श्रीकांत डिसले, सहा.पोलीस आयुक्त सो, वाकड विभाग, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली मा.श्री. गणेश जवादवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मा.श्री.रामचंद्र घाडगे पोलीस निरीक्षक गुन्हे-२, सपोनि.संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण, सपोफौ.बिभीषण कन्हेरकर, सपोफौ.बाबाजान इनामदार, सपोफौ.राजेंद्र काळे,पोहवा.वंदु गिरे, पोहवा संतोष बर्गे, पोहवा.स्वप्निल खेतले, पोहवा.दिपक साबळे, पोहवा.अतिश जाधव, पोहवा.प्रमोद कदम, पोना.अतिक शेख, पोना.विक्रांत चव्हाण, पोना.प्रशांत गिलबीले, पोशि.अजय फल्ले, पोशि.तात्या शिंदे, पोशि.स्वप्निल लोखंडे, पोशि. सौदागर लामतुरे, पोशि.विनायक घारगे, पोशि रमेश खेडकर, पोशि.कौतेंय खराडे, पोशि.भास्कर भारती, तसेच परिमंडळ-०२ कडील पोशि.पंडीत यांनी मिळुन केली आहे.

**टिप :- नागरीकांना आवाहन आहे की, ओएलएक्स वरुन कोणतीही वस्तु खरेदी करताना ओरीजनल बिलाची खात्री करुनच वस्तु घ्याव्यात अन्यथा ती वस्तु चोरीची निघलेस आपले विरुध्द् कायदेशीर कारवाई होईल.**

**तसेच सर्व सोसायटीतींल नागरीकांना आवाहन आहे की, आपले सोसायटी मध्ये बाहेरुन येणारे प्रत्येक व्यक्तीची योग्य माहीती घ्यावी व प्रवेशद्वारावर सिसीटीव्ही कॅमेरे बसवावेत.**

सदरच्या सायकली काळेवाडी, रहाटणी भागातील असलेचे निष्पन्न झाले असुन त्यांचे वर्णन खालील प्रमाणे आहे. तरी ज्यांची सायकल खालील वर्णनाची आहे त्यांनी वाकड पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा.

**१) १५,०००/- कोराडो कं ची व्ही ३३ एसएफजी सायकल काळे भगवे रंगाची**

**२) १५,०००/- काओब कं ची कीएसटीडी मॉडेलची निळी हिरवे रंगाची सायकल**

**३) १५,०००/- गँग कं ची व्हीएच सिरीजची काळे पांढरे निळे रंगाची सायकल**

**४) १५,०००/- मॉमस्टार कं ची मक्युर्री मॉडेलची काळे हिरवे रंगाची सायकल**

**५) १५,०००/-मोन्ट्रा कं ची सिल्व्हर भगवे रंगाची सायकल**

**(डॉ.काकासाहेब डोळे)**
पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ-२, पिंपरी चिंचवड